ग्रामपंचायत बोरविहीर<br>स्था.ता. ४/३/१९५६<br>ता.जि.धुळे

| विषय नंबर | विषय | पास झालेला ठराव |
|---|---|---|
| 26 | औरंगाबाद ते धुळे कि.मी. ३९०.७७७ ते कि.मी. ४५२.८०० चे खाजगी करणांअंतर्गत चौपदरीकरण बाबत गट क्र. १९६ मौजे बोरविहीर वन सदृश्य क्षेत्राचा हस्तांतरा बाबत.. | आज दि. 15/8/2018 रोजी ~~सकाळी~~ दुपारी ठिक १२/३० वा मा. सरपंच श्री. रिकला राजेंद्र ठाकरे यांचे अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयामध्ये ग्रामसभा घेण्यात आले कोरम पुर्ण झाल्याने सभेच्या कामास सुरूवात झाली.<br>मा.ग्रामविकास अधिकारी श्रीमती राम.ए. बागुल यांच्या अध्यक्षंच्या परवानगीने प्रकल्प संचालक यांचे दि. 24.11.2016 चे पत्र क्र. NHAI/PIU/AUR/NH-211/Forest Clearance/2016/1947 सभाग्रहापुढे सविस्तर वाचुन दाखविण्यात आली सभागृहात सदर विषयावर सविस्तर व सखोल चर्चा झाली भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाद्वारे राष्ट्रीय महामार्ग कार्यक्रम टप्पा आय व्ही बी अंतर्गत औरंगाबाद ते धुळे चे खाजगी करणांअंतर्गत चौपदरीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून या कामाचा समावेश केंद्र शासनाचे सन २०१७–१८ चे वार्षिक आराखडयात झालेले आहे.<br>सदर चौपदरीकरणाचे आखणीमध्य मौ. बोरविहीर गट नं. १९६ वन सदृश्य क्षेत्राचा काही भाग येते.<br>तरी सदर महामार्गचा चौपदरीकरणामुळे मौजे बोरविहीर व आजुबाजुच्या परीसराचा मोठया प्रमाणात समाजिक व आर्थिक विकास होण्यास सहाय्य होणार असुन चौपदरीकरणामुळे महामार्गावरील अपघाताच्या संकेत घट होण्यास निश्चितच मदत होणार आहे<br>तरी सदर ग्रामसभा Forest Dwellers ॲक्ट २००६ च्या आदेशाचे सन्मान राखुन मौजे बोरविहीर गट क्र. १९६ चे २.०६ हे आर क्षेत्र हस्तांतरीत करण्यास सदर क्षेत्रातील नष्ट होणा–या वृक्षांच्या पाच पटीत वृक्ष लागवड करून संवर्धन करण्याच्या अटीवर ही ग्रामसभा मान्यता देत आहे. त्यावर सभागृहात सविस्तर चर्चा होउन ठराव सर्वानुमते मंजुर |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आला.<br>अनुमोदन :– श्री. काशिनाथ धिमाजी गायकी यांनी दिले<br>ठराव मंजुर झाला. |

Seal

S.R.Thakare.
सरपंच
ग्रामपंचायत,बोरविहीर,ता.जि.धुळे

ग्रामसेवक
ग्रामपंचायत बोरविहीर
ता.जि.धुळे

Sarpanch

ग्रामपंचायत बोरविहीर
स्था.ता. ४/३/१९५६
ता.जि.धुळे